# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र.3765 / शि.वि. / 2015
दि.21 / 02 / 2015

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापक
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
महानगरपालिका, नागपूर.

विषय :– स्वाईन फ्लू रोगाबद्दल काळजी घेण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये आपणांस सूचित करण्यात येते की, मनपा शाळेतील सर्व मु.अ. ची सभा दि. 31.01.2015 शनिवार, रोजी नगरभवन टाऊन हॉल, महाल, नागपूर येथे सकाळी 10.00 वाजता कार्यशाळा घेण्यात आलेली होती व सभेत स्वाईन फ्लू रोगाविषयी माहिती व त्यावरील उपायांची चर्चा करण्यात आली होती तसेच ही माहिती शाळांमधून विद्यार्थ्यांना देण्याविषयी सांगण्यात आले होते. परंतु असे लक्षात आले की, या कार्यशाळेत देण्यात आलेल्या सूचनांचे पालन शाळांमधून होतांना दिसून येत नाही. तरी आपल्या शाळेत येणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना वारंवार सूचना देण्यात याव्यात. तसेच एखाद्या विद्यार्थ्याला जर सर्दी, खोकला, ताप येत असेल तर त्याला त्वरीत घरी पाठवून औषधोपचार करण्यास सांगावे, त्याचप्रकारे विद्यार्थ्यांना गर्दीच्या ठिकाणी वावरण्यास मज्जाव करण्यात यावा.

प्र. शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc